साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–टिकाराम मोतीरामजी कळसकर
वय ४५ वर्ष, व्यवसाय– शेती
राह.चनोडा, ता.उमरेड, जि.नागपूर.

## <u>सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत</u>

१. सदर घटनेबाबत मला माहिती आहे. घटना ही दि.१८/१२/२०२० रोजीची आहे. (सदर साक्षीदाराने हातावर पाहुन तारिख सांगितली). सदर घटना ही सायंकाळी ६.०० ते ६.३० वाजेच्या दरम्यान घडली होती. सदर दिवशी मी घरी होतो. त्यावेळी माझा भाऊ चिंतामण अजाबरावजी कळसकर याला फोन आला व सांगितले की, तुमच्या सुनेचा अपघात झाला आहे व तुम्ही लवकर या. त्यानंतर आम्ही बाईकने घटनास्थळावर गेलो व तेथे पाहिले असता आमची सुन ॲटोखाली दबुन पडली होती व ॲटोचे समोरचे चाक तुटलेले दिसले. घटनास्थळ हे बेसुर ते हिवरासिव दरम्यानचे आहे. त्यानंतर घटनास्थळावरून आम्ही आमच्या सुनेला उचलले व उमरेड येथे दवाखाण्यात आणले. आमच्या सुनेचे नाव भारती खुशाल कळसकर असे होते. सदर ॲटोचा नंबर एम.एच.४०,२१७१ असा होता.(साक्षीदाराने त्याच्या हातावर पाहुन सदर नंबर सांगितला). सदर दिवशी सदर ॲटोमध्ये प्रशांत ज्ञानेश्वर मुळे व त्यांची पत्नी व मुलगा प्रिन्स प्रशांत मुळे असे होते. याव्यतिरिक्त घटनास्थळावर लोक जमा झालेले होते. मी आरोपीला ओळखतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे. तो तोच आहे.

२. आमच्या सुनेच्या व्यतिरिक्त जे लोक ॲटोमध्ये बसलेले होते त्या लोकांना डोक्याला मार लागला होता. आमच्या सुनेच्या डोक्याला मार लागला होता. त्यानंतर आम्ही आमच्या सुनेला सरकारी दवाखाना उमरेड येथे नेले व तेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. त्यानंतर आम्ही १.०० ते १.३० वाजेच्या दरम्यान पो.स्टे.ला रिपोर्ट देण्यासाठी गेलो व रिपोर्ट दिला. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी क्र.१४** देण्यात आला. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी क्र.१५** देण्यात आला. पोलिसांनी माझी चौकशी करून बयाण घेतले होते.

<u>सरतपास संपला.</u>

<u>आरोपीतर्फे ॲड. एस.जी.भुरे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>

३. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनेची तारिख आठवत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मला ॲटोचा नंबर आठवत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनेच्या दिवशी घरीच होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाला कोणाचा फोन येउन गेला हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाने अपघाताबद्दल माहिती आम्हाला घरात सांगितली व माझा भाउसुध्दा घरीच होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्यक्ष घटना कशी घडली हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, हिवरा हिवरी ते बेसुर हा रस्ता गोटाडी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर रस्त्याने खुप खड्डे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, हिवाळ्यात संध्याकाळी लवकर रात्र होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेच्या वेळी ॲटोच्या आडवा रानडुक्कर गेला होता व तशी माहीती मला मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर रानडुक्कर ॲटोच्या आडवा गेल्यामुळे अपघात झाला होता. हे म्हणणे खरे नाही की,ॲटोच्या आडवा रानडुक्कर गेल्यामुळे ॲटो पलटी झाला त्यामुळे सगळ्याचा लोकांना दुखापती झाल्या होत्या. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, ॲटोचा टायर फुटला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर गेल्यानंतर मला माहित पडले की, माझ्या भावाच्या पत्नीचा अपघात झाला. अपघातग्रस्त ॲटो कोणाच्या मालकीचा होता हे मला सांगता येत नाही. सदर ॲटोचा मालक कोण होता याबाबत मी पोलिसांना विचारले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी दुस–याच्या सांगण्यावरून सांगत आहे की, माझी पुतनसुन मयत झाली. मयत भारती ही माझी पुतनसुन होती.

**प्रश्न**–तुम्ही लोकांच्या सांगण्यावरूनच फिर्याद नोंदविली आहे काय?

**उत्तर**–होय. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मला फोन आला होता व घटनेबाबत माहिती मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की,मी आरोपीविरूध्द खोटी तक्रार दिली व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. — समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि२०.०३.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड